# कुलगुरूंचे अभिनंदन...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला बंगळुरू येथील राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेकडून ए प्लस प्लस मानांकन प्राप्त झाल्याबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष नविद हसन मुश्रीफ यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे अभिनंदन केले. यावेळी राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष महेंद्र चव्हाण, विद्यार्थी शहरध्यक्ष प्रसाद उगवे, विद्यापीठ सिनेट सदस्य मधुकर पाटील, करण जाधव, विघ्नेश आरते, कैलास कांबळे उपस्थित होते.

आय विटनेस

# नविद मुश्रीफांकडून कुलगुरूंना शुभेच्छा



शिवाजी विद्यापीठाला 'नॅक'चे ए- प्लस प्लस मानांकन मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष नविद मुश्रीफ यांनी मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष महेंद्र चव्हाण, विद्यार्थी शहराध्यक्ष प्रसाद उगवे, अधिसभा सदस्य मधुकर पाटील, करण जाधव उपस्थित होते.

लोकमत

गडहिंग्लजची लेक : जिद्दीने झाली एम. ए., हिंदीत पाचवी, भाषा विभागात आठवी

# शिवाजी विद्यापीठात 'अंध रतन'चा झेंडा..!

राम मगदूम
लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : जन्मापासूनच आलेल्या



अंधत्वावर मात करून गडहिंग्लजच्या लेकीने शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी परीक्षेत आपल्या गुणवत्तेची मोहोर उमटवली. तिने हिंदी विषयात विद्यापीठात पाचवा तर भाषा विभागात आठवा क्रमांक पटकाविला. केवळ इच्छाशक्ती आणि जिद्दीच्या बळावर उत्तुंग यशाला गवसणी घातलेल्या या तरुणीचे नाव आहे, रतन बाबूराव गुरव. बेकनाळ (ता. गडहिंग्लज) या गावची ती रहिवासी. तिचे वडील पोलीस दलातून निवृत्त झाले असून आई गृहिणी आहे. त्यांना सुमन, रतन व ओंकार अशी तीन मुले आहेत. यापैकी रतन आणि ओंकार दोघेही जन्मापासून अंध आहेत.

अंध असूनही रतनची शिकण्याची जिद्द दांडगी. गावातून एसटी नसल्यामुळे आत्या सोनाबाईच्या मदतीने दररोज पायपीट करून तिने दहावी व बारावीतही ७० टक्याहून अधिक गुण मिळविले. परंतु, वयोमानामुळे आत्या थकल्यामुळे भावंडांचे शिक्षण थांबू नये म्हणून मोठी बहीण सुमन तिच्या मदतीला धावून आली. सुमनचे माहेर कर्नाटकात असून पती राजकुमार हे संकेश्वर आगारात कंडक्टर आहेत. केवळ भावंडांच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये म्हणून त्यांनी गडहिंग्लजमध्ये भाडोत्री घर घेऊन रतन व ओंकारला आपल्याजवळ ठेवून घेतले आहे. दररोज त्यांना महाविद्यालयाला सोडणे आणि आणण्याबरोबरच त्यांचा अभ्यासही त्याच घेतात. पदवी परीक्षेत ७८ टक्के गुण मिळविलेल्या रतनने पदव्युत्तर पदवी परीक्षेतही ७१.३१ टक्के गुण मिळविले आहेत. सध्या तिने सेट-नेटचा अभ्यासही सुरू केला आहे.

तिला प्राचार्य मंगलकुमार पाटील यांचे प्रोत्साहन तर प्रा. शिवाजीराव भुकेले, प्रा. सरोज बिडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## तिला व्हायचंय संगीत शिक्षिका

रतनने शालेय शिक्षणापासूनच संगीत शिक्षणाचे धडेही गिरवायला सुरु केले आहेत. शास्त्रीय संगीतामध्ये ती मध्यमा उत्तीर्ण झाली असून विशारद होऊन तिला संगीत शिक्षिका बनायचे आहे. 'रायटर' न मिळाल्यामुळे तिला पदवी परीक्षा देता आली नव्हती. परंतु, तिने आता पदव्युत्तर पदवी मिळवली आहे.

## ब्रेल लिपी शिकण्याचा प्रयत्न

रतनने ब्रेल लिपी शिकण्याचा प्रयत्न केला. पण, ते शक्य झाले नाही. त्यामुळे बहीण सुमन या तिला व ओंकारला पाठ्यपुस्तकातील धडे अन् नोट्स वाचून दाखवितात. त्याचे आणि मोबाईलवर रेकॉर्डिंग केलेले वर्गातील लेक्चर्स वारंवार ऐकूनच त्यांचे शिक्षण सुरु आहे.

# अंध रतन गुरव हिचे नेत्रदीपक यश

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

डॉ. घाळी कॉलेजची एम. ए. हिंदीमध्ये शिकणारी रतन गुरव या विद्यार्थिनीने शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठ स्तरावर



रतन गुरव जान्हवी नाडगोडा

पाचवा क्रमांक पटकाविला, तर भाषा विभागात तिचा आठवा क्रमांक आला. इंग्रजी विभागाची विद्यार्थिनी जान्हवी नाडगोडा हिचा पदव्युत्तर परीक्षेत चौथा क्रमांक आला. तिला महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभाग प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण पुणे यांच्याकडून राजर्षी शाहू गर्व्हन्मेंट सर्व्हंटस् को-ऑप बँक यांच्याकडून सलग तीन वर्षे पुरस्कार प्राप्त झाला आहे, तर तिला संगीत व सांस्कृतिक विभागात विशेष आवड आहे. यासाठी तिचा डॉ. घाळी कॉलेजने आदर्श युवती पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. तिला शिवाजी भुकेले, सरोज बिडकर यांचे मार्गदर्शन, तर जान्हवी नाडगोडाला ए. बी. उंदरे, नागेश मासाळ, संभाजी भांबर, आप्पासाहेब आरबोळे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्षा रत्नमाला घाळी, सतीश घाळी, अरविंद कित्तूरकर, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, संचालकांची प्रेरणा मिळाली.

जनसंपर्क कक्ष
1 0 APR 2021 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK tells students to opt for online exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University Kolhapur (SUK) has now asked all graduate and post-graduate students, who had opted for offline exams, to change their preference to online mode.

The university has cancelled the exams scheduled between April 6 an 12 mainly due to the day time prohibitory orders issued by the state government. Most of the students had opted for offline exams, meaning they were to arrive at the exam hall to take the tests.

File photo



According to university officials, the exams scheduled between April 6 and 12 will now tentatively be conducted from April 15

Those who had opted for online exams will have to appear for the exams online during the time slot given to them. The circular issued by the university states, "Considering the given situation of Covid-19, conducting offline exams is not suitable. Instead we appeal the students to register for online exams. They have to merely visit the university website and update the basic details. The schedule for their exams will be soon released. For those who persist to write papers offline, a separate schedule will be declared for them and exams will be held only after the pandemic situation subsides."

The students have been asked to register for online exams by 4 pm on Saturday. According to university officials, the exams scheduled between April 6 and 12 will now tentatively be conducted from April 15 onwards.

The exams for professional courses such as pharmacy, engineering, law, management and architecture will be held online and the students will be called in groups at their respective colleges to take the test.